# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 03/07/2023 (सोमवार) दुपार


## अवैध रेती चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद
## पोलीस स्टेशन रामटेकची कार्यवाही

दिनांक ०२/०७/२०२३ रोजी पोलीस स्टेशन रामटेक येथील स्टाफ रामटेक उपविभागात पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरव्दारे खबर मिळाली की, पोलिस ठाणे रामटेक हद्दीतील ०६ किमी अंतरावर नवरगाव शिवार रामटेक येथे अवैधरीत्या विनापरवाना रेतीची टिप्पर व्दारे चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहितीवरून पोलीस स्टेशन रामटेक येथील स्टाफ याने नमुद घटनास्थळी जावुन टिप्पर क्र. एम. एच.– ४९ ए. टी.– ०९९० च्या चालकाला थांबवून तपासले असता सदर वाहनात टिप्पर चालक व **आरोपी नामे– निलेश पुरूषोत्तमभाई दुधांत, वय ३७ वर्ष, रा. भिमराव आगासे हाउस नं १४२ खरबी चौक, साईबाबा नगर, नागपुर** हा टिप्परमध्ये अवैधरीत्या रेतीची चोरी करतांना मिळुन आल्याने त्याच्या ताब्यातून टिप्पर क्र. एम. एच.– ४९ ए. टी.– ०९९० किंमती अंदाजे किंमती अंदाजे १०,००,०००/– रू. व ७ ब्रास रेती किंमती अंदाजे २१,०००/– रू. असा एकुण १०२१०००/– रूपयाचा मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातुन जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे–पोलीस शिपाई शरद गिते ब. नं. २३४३ पोस्टे रामटेक यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत लांजेवार मो. नं. ९७६४१९०९५१ हे करीत आहे.

सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक श्री. डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनात पोलीस स्टेशन रामटेक येथील ठाणेदार यादव, पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत लांजेवार, पोलीस नायक प्रफुल रंधई, मंगेश सोनटक्के, पोलीस शिपाई शरद गिते यांनी केली.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर